प्राथमिक शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना
विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-3 वर्ग-3 (मराठी
माध्यम) या पदावर ज्येष्ठतेने पदोन्नती देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्राथमिक शिक्षण विभाग
आदेश जा.क्र.कार्या-1/पीई-5/पदो/ 275/2025
अहिल्यानगर दि. /07/2025.
0 4 AUG 2025

**वाचा** :- 1. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक 10 जुन 2014 ची अधिसुचना
2. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम दिनांक 01/03/2019.
3. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.-एसआरव्ही-2018/प्र.क्र.59/का-12 दि.01/08/2019.
4. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब दि.07/05/2021.
5. महाराष्ट्र शासन सामान्य् प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग/2022/प्र.क्र.83/16-अ मंत्रालय, मुंबई दि.20 एप्रिल, 2023.
6. पदोन्नती निवड समिती इतिवृत्त दि.24/03/2025.
7. समुपदेशन प्रक्रिया दिनांक 29/07/2025

## ::: आदेश :::

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम 1967 मधील नियम 05 परिशिष्ठ् चार (भाग एक) मधील नियम 05 अनुक्रमांक 3 मधील तरतुदीनुसार शिक्षकांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेच्या आधारे शिक्षक (गट-क) या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना विस्तार अधिकारी श्रेणी-3 वर्ग-3 मराठी माध्यम या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन वेतनस्तर व मॅट्रीक्स एस-14 (38600-122800) या वेतनश्रेणीमध्ये रकाना क्रमांक ६ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. सदर पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्रमांक 4 मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे मा.सर्वोच्च् न्यायालयात राज्य शासनाने विशेष अनुमंती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | शाळा/ केंद्र | तालुका | निवड प्रवर्ग | पदोन्नतीने दिलेले बीट/ | तालुका |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | |
| 1 | कळमकर संजय विठ्ठल | केंद्रप्रमुख | चिचोंडी पाटील | अहिल्यानगर | जेष्ठतेनुसार | घोडेगांव | नेवासा |
| 2 | गायकवाड निलिमा गणपत | मुख्याध्यापक | उंबरे | राहुरी | जेष्ठतेनुसार | घारगाव | संगमनेर |
| 3 | आरु छाया बजरंग | मुख्याध्यापक | धनगरवाडी | अहिल्यानगर | जेष्ठतेनुसार | मांडवगण | श्रीगोंदा |
| 4 | व्होरा जयश्री शिवलाल | मुख्याध्यापक | खंडाळा | अहिल्यानगर | जेष्ठतेनुसार | वडझिरे | पारनेर |
| 5 | फापाळे सुरेखा रंगनाथ | मुख्याध्यापक | राळेगण थेरपाळ | पारनेर | जेष्ठतेनुसार | समशेरपुर | अकोले |

**अटी व शर्ती :-**

1. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तातपुरत्या स्वरुपात दिलेली आहे.

2. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे पदोन्नतीमुळे जेष्ठतेचा हक्क प्राप्त होणार नाही.

3. पदोन्नतीने नेमणुकीचे ठिकाणी विहित करुन दिलेल्या कालावधीत हजर न झाल्यास तसेच पदोन्नतीने नेमणुकीच्या पदस्थापनेत बदल करणे साठी दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 4 नुसार कारवाई करण्यात येईल.

4. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी पदोन्नतीने निवड केलेल्या कर्मचाऱ्यास नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने सात दिवसांचे आत पदोननतीचे ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा सेवाज्येष्ठता डावलली जाईल.

5. सदर पदोन्नतीची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

6. पदोन्नतीने हजर झालेल्या कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे अनुषंगाने वेतननिश्चिती करिता 1 महिन्याचे आत विकल्प देणे बंधनकारक राहील.

7. सदर आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक 202508041600 73 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 02-08-2025 17:17:30

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री./श्रीम.-------------------------- (उपरोक्त यादीतील अ.क्र.1 ते 5 मधील उपाध्यापक, मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख)

यांना अनुपालनास्तव

व्दारा व प्रत,

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर/पारनेर/राहुरी

2/- सदर आदेशाची प्रत संबंधित कर्मचारी यांना बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेणेत यावी. तसेच पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे पदस्थापनेचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करुन व हजर झालेले कर्मचारी यांचा अहवाल इकडेस सादर करण्याची दक्षता घ्यावी.

प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नेवासा/संगमनेर,श्रीगोंदा/पारनेर/अकोले

प्रत :- कार्या-2,आस्था-2 शिक्षण विभाग जिल्हा परिषद,अहिल्यानगर

प्रत :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरी/-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर